दैनिक अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

मुख्य संपादक : सुनिल पोतदार

● वर्ष १६ वे ● अंक ७४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.७ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## रायगडकरांसाठी आजपासून नवे नियम

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर रायगडकरांसाठी सोमवार (७ जून) पासून नवीन नियम जाहीर करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी आज याबाबतचे आदेश जारी केले आहेत.यामध्ये अत्यावश्यक सेवांसह व्यायामशाळा, सलून, ब्युटी पार्लर, स्पाला दिलासा मिळाला आहे.

अत्यावश्यक वस्तू व सेवांची दुकाने हा संपूर्ण आठवडा दुपारी ४ वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. यासोबतच सार्वजनिक बस वाहतूक ५० टक्के प्रवासी क्षमतेने सुरु राहणार आहे.राज्यात सोमवार (७ जून) पासून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लावलेले निर्बंध उठविण्याची प्रक्रिया सुरु केली जाणार आहे. जिल्हानिहाय रुग्णसंख्येनुसार असलेला पॉझिटीव्हीटी दर व ऑक्सिजन बेडची उपलब्धता हे निषक ठेवून, निर्बंधांबाबत विविध स्तर निश्चित करण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्याचा समावेश चौथ्या स्तरामध्ये आहे. त्यानुसार पोलीस अधीक्षक-रायगड यांच्या कार्यक्षेत्रासाठी जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी आज (६ जून) याबाबतचे आदेश जारी केले असून, ७ जून २०२१ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून निर्बंध लागू राहणार आहेत.

# विमानतळाला बाळासाहेब ठाकरे नाव देण्यासाठी महाविकास आघाडी ठाम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई विमानतळ नामकरणासाठी प्रकल्पग्रस्त स्थानिक भूमिपुत्रांची दिशाभूल करण्याकरता तिथे गेल्यानंतर भारतीय जनता पार्टीचे स्थानिक नेते राजकारण करून सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत तसेच आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांनी प्रकल्पग्रस्तांना भडकविण्याचा घाट घातला आहे. मात्र पनवेल उरण महाविकास आघाडीचे नेते विमानतळाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याच्या निर्णयावर ठाम राहिले आहेत. असे वक्तव्य महाविकास आघाडीच्या नेत्यांनी खारघर येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले.



या पत्रकार परिषदेला महाविकास आघाडीच्या समितीचे बबनदादा पाटील, आ.बाळाराम पाटील, मा.आ.मनोहर भोईर, आर.सी.घरत, जे.एम. म्हात्रे, महेंद्र घरत, प्रशांत पाटील, शिरीष घरत, काशिनाथ पाटील, सुदाम पाटील, रामदास शेवाळे, रामदास पाटील, गणेश कडू, राजेश केनी, गुरुनाथ पाटील, हेमराज म्हात्रे, प्रदीप ठाकूर, दीपक घरत आदींसह महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

विमानतळ नामकरणासाठी इतका अट्टाहास होता, तर प्रशांत ठाकूर सिडको अध्यक्ष असताना तसा ठराव का केला नाही ? किंवा मग सहा महिन्यापूर्वी नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाची मागणी केली त्यावेळी हे स्वार्थी नेते कुठे गेले होते ? जर यांना दि.बा.पाटील यांच्या नावासाठी झटायचे होते मग ६ महिने कोणाची वाट बघत होते ? आज राज्यात महाविकास आघाडी सरकार भक्कमपणे काम करीत आहे आणि भाजपचे राज्यातील नेते सरकार पाडण्यासाठी नको त्या थराला जात आहेत. अशीच परिस्थिती आता पनवेल उरणमधील स्थानिक भाजप नेते करत आहेत असा आरोप यावेळी बबन पाटील यांनी केला.

महाराष्ट्रात विमानतळाच्या नामकरणासाठी विधानसभेच्या ठरावाची आवश्यकता असते. मात्र त्यावेळी भाजपचे दोन्ही विरोधी पक्ष नेते आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष आपल्या १०५ आमदारांना विमानतळाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यासाठी विरोध करतील का ? आणि याबाबत ते जाहीर करणार का ? या प्रश्नाचे उत्तर भाजपच्या प्रदेशाध्यक्षांनी द्यावे तसेच भाजपचे राष्ट्रीय नेते दि.बा. पाटील यांच्या नावाला समर्थन करणार की मग बाळासाहेब ठाकरे यांना ? असा सवालही यावेळी करण्यात आला.

यावेळी शेवटी बोलताना बबनदादा पाटील यांनी सांगितले की, पनवेल उरण महाविकास आघाडीची स्वर्गीय दि.बा.पाटील स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समिती, आहे तसेच ती कायम राहणार आहे. दि.बा.पाटील यांची अपूर्ण कामे आमच्या मार्फत सुरूच राहतील. स्थानिकांचे अनेक प्रश्न आहेत, त्यांच्या गरजेपोटी घरांना कायम करण्यासाठी आमचा लढा सुरूच आहे, पुनर्वसित प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी सोडवण्यासाठी आम्ही पाठपुरावा करतोय. आधीच त्रासलेल्या प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांना भडकावुन त्यांचे संसार कशाला उघड्यावर आणताय ? हे आम्ही खपवून घेणार नाही. दि.बा.पाटील हे आमचे आधार स्थान आहेत, त्यांच्या नावासाठी मोठे प्रकल्प आपल्यासमोर आहेत. मात्र विमानतळ नामकरणासाठी स्थानिक भाजप नेत्यांकडून केलेलं राजकारण पाहता पनवेल-उरण महाविकास आघाडी स्व. बाळासाहेब ठाकरे अंतरराष्ट्रीय विमानतळ या नावावर ठाम राहिली आहे आणि राहणार असल्याचा सूरही यावेळी लगावण्यात आला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, यासाठी लोकनेते दि.बा.पाटील विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून आंदोलनाची तीव्रता अधिक असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. यासोबतच विमानतळ नामकरणासाठी भाजप विरुद्ध महाविकास आघाडीच्या माध्यमातून शहरातील विविध ठिकाणी बॅनरबाजी सुद्धा होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे विमानतळ नामकरणाचा वाद आता चांगलाच ढवळून निघाला आहे.

### ते तर महाविकास आघाडीत फूट पाडण्यासाठी केलेले राजकारण

विमानतळ नामकरणाचा मुद्दा केवळ राजकारण करण्यासाठीच भाजप नेतेमंडळी उचलून धरत आहेत हे आम्हाला जेंव्हा कळलं त्यावेळेपासून आम्ही मागे सरलो. यापूर्वी महाविकास आघाडीतील काही नेतेमंडळी भाजप नेतेमंडळींसह या आंदोलनात सहभागी झाले होते. विमानतळाला नाव दिबांचेच देण्यात यावे अशी भूमिका घेऊन वेळोवेळी भाजपच्या सुरात सूर मिसळत असल्याचे दिसून येत होते. परंतु त्या नेत्यांनी आता यु टर्न भूमिका घेतली असून महाविकास आघाडी बरोबरच ठाम राहून विमानतळाला नाव बाळासाहेबांचे देण्यात यावे अशी स्पष्ट भूमिका घेत आहेत. स्वतःच्या स्वार्थासाठी महाविकास आघाडीत फूट पाडण्याचे राजकारण भाजप करत असल्याचा आरोप यावेळी महाविकास आघाडीच्या नेतेमंडळींनी केला.

> विमानतळ नामकरणाच्या मुद्द्यावरून भाजपचे स्थानिक नेते राजकारण करत आहेत. दिबा पाटील हे स्थानिक प्रकल्पग्रस्त नेते आहेत. बाळासाहेबांप्रमाणेच दिबा पाटील यांच्याबद्दल आमच्या मनात नितांत आदर आहे. दिबांच्या नावाचा योग्य सन्मान महाविकास आघाडीच्या माध्यमातून होणार याची ग्वाही देतो. नवी मुंबई विमानतळाला नाव बाळासाहेबांचेच.! यावर महाविकास आघाडी ठाम आहे. परंतु दिबांच्या नावाचा सन्मान होण्यासाठी एखाद्या राष्ट्रीय प्रकल्पाला दिबांचे नाव देण्यासाठी आंदोलनाचीही तयारी महाविकास आघाडीची आहे.
>
> **- बबन पाटील (महाविकास आघाडी समिती अध्यक्ष)**

## संक्षिप्त...

### पत्रकार वचन गायकवाड यांचे कोरोनाने निधन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय तसेच पत्रकारिता क्षेत्रात अग्रेसर असलेले तरूण पत्रकार वचन गायकवाड यांचे नुकतेच कोरोनाने निधन झाले. अतिशय तरूण वयात असा धडाडीचा सहकारी गमावल्याने पनवेलच्या पत्रकार बांधवांमध्ये शोकमय वातावरण पसरले आहे. वचन गायकवाड हे गेली काही दिवस कोरोनाशी झुंज देत होते. त्यांच्यावर कामोठे येथील एम.जी.एम. रूग्णालयात उपचार सुरू होते, पण अचानक त्यांची प्रकृती जास्त अत्यवस्थ झाल्याने शेवटी काळाने त्यांच्यावर झडप घातली.

वचन गायकवाड हे दैनिक कर्नाळा त्याचबरोबर सिटी बेल वृत्तसमुहात कार्यरत होते. त्याचप्रमाणे ते न्यु इंग्लिश स्कूल देवीचा पाडा येथे कार्यरत होते. इतक्या तरूण वयात त्यांचे एक्सिक्ट होणे, विश्वास बसण्यासारखे नाही. त्यांच्या आकस्मित निधनाने त्यांच्या कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. वचन गायकवाड यांच्या निधनाची बातमी पनवेल परिसरात समजताच पनवेल, उरण तालुक्यातील सर्वच पत्रकारांनी तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी शोक व्यक्त केला आहे.

**मराठा आरक्षण संदर्भात महाविकास विकास आघाडीचा निष्काळजीपणा**

## ठाकरे सरकारने वराती मागून घोडे चालवल्यामुळे आरक्षण टिकले नाही : प्रविण दरेकर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

फडणवीस सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले, मात्र महाविकास आघाडीच्या निष्काळजीपणा आणि वराती मागून घोडे चालविण्याच्या निष्क्रिय कारभारामुळे टिकवता आले, अशी घणाघाती टीका विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांनी येथे केली. मराठा समाजाच्या आरक्षण संदर्भात मराठा समाजातील मंडळींशी चर्चा तसेच पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

मराठा आरक्षणासंदर्भात वेगवेगळ्या टप्प्यावर लोकांच्या मनात संभ्रम निर्माण होत आहे. सुप्रीम कोर्टाने दिलेला निकाल, कोणाचे काय चुकलं याची व्यापक चर्चा विधिमंडळात होऊ शकते. आणि पुनः नव्याने आरक्षण देण्यासाठी काय उपाययोजना केल्या पाहिजे याविषयी चर्चा विधिमंडळात होऊ शकते. अशाप्रकारचं अधिवेशन घेण्याची आवश्यकता आहे आणि ते लवकरात लवकर घेण्यात यावे अशी मागणीही प्रविण दरेकर यांनी यावेळी केली. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजपचे ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, शहराध्यक्ष जयंत पगडे, नगरसेविका संजना कदम, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, युवा नेते किरण ठाकरे, समीर कदम आदी उपस्थित होते. पत्रकारांशी बोलताना प्रविण दरेकर यांनी पुढे म्हंटले कि, मराठा समाजाच्या बाबतीत महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून दीड वर्षाच्या काळात जो निष्क्रियता, ढोंगीपणा, खोटारडेपणा झाला आहे त्याची पोलखोल करण्यासाठी आज उपस्थित आहे.

मराठा आरक्षण फडणवीस सरकारने अबाधित ठेवले होते. त्या दरम्यान झालेल्या याचिकेनंतर सरकार बदलले आणि महाविकास आघाडी सरकारने ज्या पद्धतीने लक्ष घालायला हवे होते ते त्या ठिकाणी घातले गेले नाही. याचिकेच्या वेळीस महाविकास राज्यसरकारचे वकील वेळेस उपस्थित नव्हते, सल्लागारांशी समन्वय ठेवला गेला नाही. तसेच आवश्यक दस्तावेज सुप्रीम कोर्टात उपलब्ध केले गेले नाही त्याचबरोबरीने १६०० पानाचे परिशिष्ट भाषांतर करून दिले गेले नाही, त्यामुळे आक्षेप घेत सुप्रीम कोर्टाने आरक्षण रद्द केले. तुम्ही केवळ मराठा समाजाची बाजू ऐकली, तुम्ही इतर समजाच हेरिंग घेतल नाही. जर १६०० पानांचे मराठी परिशिष्ट इंग्रजी मध्ये रूपांतरित करून दिले असते तर कदाचित सुप्रीम कोर्टाचा निर्णय मराठा आरक्षणाच्या बाजूने लागला असता. मात्र तसे करायचे नव्हते म्हणूनच महाविकास आघाडी सरकारने निष्काळजीपणा केला असता आरोपही दरेकर यांनी केला.

महाविकास आघाडी सरकारच्या मराठा समाजाच्या उद्देशाच्या मागे शंका होती काय ते आता पुढे येत आहे. अशाप्रकारच्या निष्क्रियता त्याचा परिपाक म्हणून शेवटी आरक्षण रद्द झाले. रद्द करण्याच्या मागे जाण्यापेक्षा घटना गठीत करण्याची मागणी होती. परंतु रद्द झाल्यानंतर घटना पिठाची नंतर मागणी झाली आणि ५ जणांच घटनापीठ तयार करण्यात आले. ५ जणांच्या घटनापिठामध्ये तीन तज्ज्ञ होते, सदस्य होते ज्याने आरक्षण देण्याचा निकाल दिला होता तेच जर ५ पैकी .../२

**रायगडवर शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा...**

## १६ जूनपासून मराठा समाजाच्या आंदोलनाला सुरुवात : संभाजीराजे



**दै.रायगड नगरी । महाड**

राजसदरेवरुन बोलतोय, तुम्ही समाजाचा खेळ केला तर आम्ही गप्प बसणार नाही. मी संयमी आहे, आजपर्यंत सहन केलं पण आता गप्प बसणार नाही, काय होईल ते होईल असं सांगत संभाजीराजे छत्रपतींनी मराठा समाजाला आंदोलनाची हाक दिली आहे. येत्या १६ जून पासून राजर्षी शाहू महाराजांच्या समाधीपासून मराठा आरक्षण आंदोलनाला सुरुवात होईल असं संभाजीराजे म्हणाले. रायगडवरील शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न झाल्यावर संभाजीराजेंनी आपली भूमिका मांडली.

दिशा दाखवणं हे आमचं काम आहे, कोणाहाली दिशाहीन करणे हे आमच्या रक्तात नाही असं सांगत संभाजीराजे म्हणाले की, रायगडावरुन आतापर्यंत नेहमी सामान्यांचे विषय मांडले, कोणताही राजकारणाचा मुद्दा मांडला नाही. ज्या शिवाजी महाराजांनी बहुजनांसाठी स्वराज्य निर्माण केलं, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी पहिल्यांदा आरक्षण दिलं त्यांच्याच राज्यात आज मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी झगडावं लागतंय हे दुर्दैव आहे.

संभाजीराजे छत्रपती .../२

## जिल्हा परिषदेच्यावतीने शिवस्वराज्य दिन जिल्ह्यात उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शिवस्वराज्य दिना निमित्त रायगड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आज (दि.६ जून) रोजी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते व जिल्हा परिषद अध्यक्ष योगिता पारधी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारून व या गुढीचे यथासांग पूजन करून अभिवादन करण्यात आले.



यानंतर जिल्हा परिषदेतील अभ्यागत कक्ष येथे अतिशय सुंदर, प्रेरक अशा छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळ्याच्या प्रतिमेचे तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे अनावरण त्याचबरोबर मोबाईल लसीकरण व्हॅनचे लोकार्पण पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती गीताताई जाधव, कृषी व पशुसंवर्धन सभापती बबन मनवे,विरोधी पक्ष नेते सुरेंद्र म्हात्रे, पक्ष प्रतोद मानसी दळवी,माजी उपाध्यक्ष ड. आस्वाद पाटील, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन ) नितीन मंडलिक , उप मुख्य ..../२

## भाजपात प्रवेश केलेल्या नगरसेवकांना बळकटी देणार : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान मध्ये शिवसेनेसाठी राजकारणाचे उलटे वारे वाहू लागताच मध्यंतरी भाजपात प्रवेश केलेल्या नगरसेवकांना बळकटी देण्यासाठी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज दि.६ जुन रोजी माथेरान दौरा केला. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७०व्या वाढदिवसाचे औचित्य साधत कोव्हीड १९ मुळे थंड हवेच्या पर्यटनस्थळावरील अर्थकारणाचा कणाच मोडल्याने येथील सर्वसामान्यांना कुटुंबाचे उदरनिर्वाह करणे जिकिरीचे झाले होते.यासाठी माथेरानकरांना दिलासा म्हणून भारतीय जनता पक्षाच्यावतीने जिवनावश्यक कीट वाटपासह काही कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश देखील करण्यात आला.

यावेळी प्रशांत ठाकूर यांच्या .../२





**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९

# श्वेतक्रांतीला आव्हान

'अमूल' या भारतातील सर्वांत मोठ्या दूध सहकारी संस्थेने आता गायी-म्हशींच्या दुधाऐवजी 'व्हेगन मिल्क', म्हणजे सोयाबीन, बदाम, शेंगदाणे किंवा तत्सम पिकांपासून निघणारे दूध हा पर्याय स्वीकारला पाहिजे, अशी सूचना करून 'पेटा' (पीपल फॉर एथिकल ट्रीटमेंट ऑफ ॲनिमल्स) या समाजसेवी संस्था म्हणवून घेणाऱ्या कंपनीने भारताच्या वाटचालीला एक धक्काच दिला आहे. ही मागणी फक्त प्राणीप्रेमातून आली आहे, की त्यामागे काही जागतिक स्तरावरील कारस्थान आहे, याचा शोध केंद्र सरकार घेईलच; पण जागतिक भांडवलदारांच्या पाठिंब्यावर विकसनशील देशांमध्ये अशा पद्धतीचे खेळले जाणारे खेळ नवीन नाहीत. ही मागणी या संस्थेने प्राणिप्रेमातून केली असल्याचे मान्य केले, तरीही भारतातील सहकारी दूध संस्था, लाखो शेतकरी, दुधाची श्वेतक्रांती साऱ्या देशभर पोहोचविणारे असंख्य क्रांतिदूत यांवर आणि पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा दूरगामी परिणाम होणार आहे, हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे. गायी किंवा म्हशींच्या दुधात कॅल्शियम, प्रथिने, फॉस्फरस, मॅग्नेशियम, आयोडिन आणि ए, डी, के, ई ही जीवनसत्त्वे; तसेच फॅट असते. दूध हे कॅलरी म्हणजे उष्मांक, ऊर्जा पुरविणारे महत्त्वाचे अन्न आहे. यासाठीच शाकाहाराचे मोठे प्रमाण असणाऱ्या भारतात अनेक शतके दुधाचा गौरव 'पूर्णान्न' असा होत आला आहे. तो सर्वार्थाने योग्य आहे. अशा पद्धतीची मागणी करणाऱ्यांना भारतासारख्या देशातील गरीब मुलांची भूक, तहान आणि दूध मिळण्यासाठीची तळमळ समजत नसेल, असे म्हणता येणार नाही. त्यांना ना ग्रामीण भारत कळतो, ना भारताची अर्थव्यवस्था कळते, ना जगात दुधाचे सर्वाधिक उत्पादन करणाऱ्या भारताचे पोषण कसे होते ते समजते, असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. भारतासारख्या देशामध्ये अजूनही ग्रामीण भागांत बालकांची जीवनसत्वांची गरज भागविण्याचा दूध हा सर्वांत स्वस्त आणि योग्य पर्याय आहे. दुधाचे उत्पादन जाणीवपूर्वक वाढविण्यासाठी श्वेतक्रांती, दूधाचा महापूर यांसारख्या योजना सुरू होण्यामागील कारणही हेच आहे. यातूनच दूध पुरविण्यासाठी स्वतंत्र चळवळ उभी राहिली; अनेक शेतकऱ्यांची शाश्वत जोड उत्पन्नाची सोय झाली. त्याच्या आधारेच ओल्या किंवा कोरड्या दुष्काळासारख्या आपत्तीत शेतकरी तग धरून राहू शकले. या दुग्धक्रांतीने भारतातील कोट्यवधी घरांना आर्थिक स्तर उंचावण्याची संधीच दिली. 'पेटा'ने 'अमूल' या लोकप्रिय दुधाच्या ब्रँडला पत्र लिहून, 'व्हेगन मिल्क'कडे वळण्याचा दिलेला सल्ला म्हणजे श्वेतक्रांतीला आव्हानच म्हटले पाहिजे. हा सल्ला 'अमूल'पुरताच मर्यादित नसून, देशातील सारे गोपालक आणि दुग्धजन्य पदार्थांचे अर्थकारण यांना धक्का देणारा आहे. आता एका वेगळ्या; पण काहीशा जुन्या बातमीकडे नजर वळवू या. टेक्सासहून दोन वर्षांपूर्वी आलेल्या बातमीत म्हटले होते, की अमेरिकेतील 'सोयाबीन एक्सपोर्ट कौन्सिल'ने साऱ्या जगाचा दौरा केला आणि सोयाबीन निर्यातीसाठी भारत हीच जगातील सर्वोत्तम बाजारपेठ आहे, हे कौन्सिलच्या लक्षात आले. याचे कारणही मोठे विलक्षण होते. भारतातील म्हणे, ७३ टक्के नागरिकांमध्ये प्रथिनांची कमतरता असते आणि ९० टक्के रहिवाशांना हेही कळत नाही, की आपल्याला प्रथिनांचा खरा पुरवठा कोणत्या अन्नातून होतो. यापुढचा भाग महत्त्वाचा आहे. सोयाबीन कौन्सिल भारतात 'लोकशिक्षण मोहीम' हाती घेईल. याचे कारण २०३० मध्ये भारतातील ५० टक्के नागरिक हे मध्यम वर्गात आलेले असतील आणि त्यांना कळेल, की आपण प्रथिनोपाशी आहोत. ही उपासमार भरून काढायची, तर आपल्याला सोयाबीन खायला हवे आणि तेही अमेरिकेतून आयात केलेले. 'पेटा'चा अमूल आणि दुधावरील हल्ला व अमेरिकेतील सोयाबीन लॉबीचे भारत पादाक्रांत करण्याचे स्वप्न यांचे नाते आहे का, याचाही छडा केंद्र सरकारने लावायला हवा. या निमित्ताने या विषयावर देशव्यापी चर्चा घडवून आणण्याची योजना दिसते. गाय, म्हैस, शेळी, मेंढी, काही प्रमाणात उंट, याक या साऱ्यांचे दूध पिणे ही भारताची काही हजार वर्षांची संस्कृती आहे. हे दूध काढले जाताना यातल्या कोणत्याही प्राण्याचा भारतीय शेतकरी कधीही छळ करीत नाही. गायी किंवा म्हशींनी जास्त दूध द्यावे, यासाठी काही वेळा अतिरेकी औषधे किंवा इंजेक्शने दिली जात असतील. ते चूकच आहे; पण गोपालन ही भारताची संस्कृती आहे. भारतातील लाखो शेतकरी आपल्या दुभत्या जनावरांना घरातल्या माणसाइतकेच प्रेम व महत्त्व देतात, हे लक्षात घेतले पाहिजे. जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर केवळ बाजारकेंद्रीत अर्थव्यवस्था हे साध्य समजले जाऊ लागले असून, प्रत्यक्षातील उत्पन्न व गरिबीपेक्षा शेअरबाजारातील निर्देशांकाची उसळी महत्त्वाची मानली जाऊ लागली आहे. भारतासारख्या विकासाची आस असलेल्या देशाला पाश्चिमात्य निकष परवडणारे नाहीत. अनेकांची पोटे भरण्याचे आव्हान असलेल्या या देशामध्ये म्हणूनच दुधाचा सोपा पर्याय बंद करणे परवडणारे नाही.

# वडवली येथे शिवस्वराज्य दिन साजरा

**दै.रायगड नगरी । दिघी**

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाना शिवस्वराज्य दिन साजरा करण्याचे आदेश महाराष्ट्र शासनाने दिल्याने श्रीवर्धन तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वडवली येथे शिवस्वराज्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

वडवली ग्रामपंचायतीत रविवारी सकाळी शिवस्वराज्य दिन साजरा झाला. यावेळी प्रथमच स्थानिक संस्थामधून साजरा होत असलेला सोहळा कोरोना पाश्र्वभूमीवर सोशल डिस्टंसिंग कडे विशेष लक्ष देण्यात आले. शिवस्वराज्य दिनी ध्वजावर सुवर्ण कलश, आंब्याची डहाळी, गाठी, पुष्पहार, अष्टगंध, हळद, अक्षता, कुंकू लावून कलशावर अष्टगंधने शिवशक राजदंड स्वराज्य गुढी तयार करण्यात आली. सरपंच प्रियंका नाक्ती यांच्या हस्ते पूजन करत मान्यवरांच्या उपस्थितीत शिवशक राजदंड स्वराज्य गुढी उभारण्यात आली.



त्यानंतर पुढे सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य, गावातील प्रमुख अतिथी, ग्रामस्थ आणि शिवप्रेमी इत्यादी मान्यवरांच्या हस्ते राजदंडाचे पूजन करण्यात आले. सदर प्रसंगी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, महाराजांचा धेय्यमंत्र, गारद घेण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी श्री शिवशंभू प्रतिष्ठानचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी किरण चाळके यांनी छत्रपती शिवरायांनी उभं केलेल्या स्वराज्याबाबत माहिती देऊन उपस्थितांना संबोधित केले. प्रथमच होत असलेल्या कार्यक्रमाला उस्फुर्त प्रतिसाद मिळाल्याने ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी प्रज्योत सर्वे यांनी मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# डंपरची मोटारसायकलला धडक; एक ठार एक जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील मौजे पाडेघर गावाच्या हद्दीत उरण ते पनवेल जुन्या रस्त्यावरील गव्हाण फाट्याजवळ एका डंपरने मोटारसायकलीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलीवरील एक जण मृत पावला आहे. तर दुसरा जखमी झाला आहे.

शाहिद असगर अन्सारी (वय-२०, रा.-करावे गाव) व त्याच्यासोबत त्याचे वडिल असगर इलियास अन्सारी (वय-२०) हे बजाज मोटारसायकलीवरून नेरूळ येथून निघून पनवेल बाजूकडे येत असताना गव्हाण फाट्याजवळ उभ्या असलेल्या डंपरवरील चालकाने त्याचा डंपर हा अचानकपणे चालू करून वळविण्यासाठी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अविचाराने हयगयीने चालवून त्यांच्या मोटारसायकलीस समोरील बाजूस जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात असगर अन्सारी हे गंभीर जखमी होऊन मरण पावले आहेत. तर शाहिद हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# माथेरानमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

युगपुरुष हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिन माथेरान मध्ये साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला माथेरान शहर कॉंग्रेस अध्यक्ष मनोज खेडकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मनोज खेडकर यांच्यासह नगरपरिषद सभागृहातील कार्यशील विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे, युवा कॉंग्रेस अध्यक्ष आदित्य भिल्लारे, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे, माथेरान नागरी सहकारी पतसंस्था सभापती हेमंत पवार, केतन रामाणे, हर्ष शिंदे, महिला



आघाडीच्या सक्रिय कार्यकर्त्या वर्षा शिंदे, सुहासिनी दाभेकर, अर्चना कदम,मंगेश शिंदे,बिलाल महापुळे, संतोष रामचंद्र कदम,अरविंद रांजणे, वैभव पवार, शेखर रांजणे, शुभम गायकवाड, विजय सदाशिव कदम, अमोल काळे, सचिन काळे, जहूर चिपाडे, पप्पू खान,यश शिंदे, व्यापारी मुकेश शहा, माजी नगरसेवक संतोष लखन, अंकित,भारत कारंडे यांसह नव्याने कॉंगेस पक्षात स्वेच्छेने प्रवेश केला आहे ते शिवसेनेचे जेष्ठ कार्यकर्ते विठ्ठल पवार यांसह असंख्य कॉंग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून विविध भागांतील विविध पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी शहर अध्यक्ष मनोज खेडकर, विद्यमान नगरसेवक शिवाजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून प्रवेश केला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आरक्षण टिकले नाही : प्रविण दरेकर

तीन असतील तर निर्णय स्वतःचा कशासाठी बदलू शकतात. घटनापीठामध्ये कोण असावे या संदर्भात काळजी घेतली गेली नाही. ५ पैकी ३ सदस्य जुने आहे. त्या अर्थी त्यांचा निर्णय त्या दृष्टीने असेल हि बाजू मांडू शकले नाही. ३- २ असा निकाल झाला. कायदा करण्याचा अधिकार राज्यसरकारला आहे, ह्यावर सर्वांचं मत होते. ३ जणांचं म्हणणे होते कि, मागासवर्गीय मागासले सिद्ध करण्याचा अधिकार नाही. दोघांचे म्हणणे होते की अधिकार आहे. अशाप्रकारे मतभिन्नता झाली. केंद्र सरकार पूणर्पणे मराठा समाजच्या बाजूने होते आणि आहे. तुषार मेहता नावाचे केंद्रीय ॲटर्नी जनरल बाजू मांडायला होते. त्यांनी सांगितलं कायदा वैध आहे. त्यांनी सांगितलं पंतप्रधान, केंद्र मराठा आरक्षणाच्या बाजूने होते जे काही आरक्षण गेले त्याला पूर्णपणे महाराष्ट्र सरकारची निष्क्रियता, दुर्लक्षपणा कारणीभूत आहे.

आरक्षण रद्द झाल्यानंतर तिसऱ्या टप्प्यावर गतीने लक्ष घालायला पाहिजे. ते सुद्धा दिसून येत नाही. पिटिशियन साठी नेमणूक करायचं निवडण्याचं अशोक चव्हाण म्हणत होते त्याला किती दिवस झाले. खर म्हणजे विषय समजून न घेता लोकांसमोर ढोंगीपणा कसा महाविकास आघाडी सरकार करत आहे हे सुद्धा निदर्शनास येत आहे.असे सांगतानाच राज्यपालांना जाऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पत्र लिहितात, राज्यपालांनी केंद्राला कळवून आरक्षण द्यावं अशा प्रकारचा समजून उमजून खोटेपणा महाविकास आघाडी सरकार करताना दिसून येते. राज्यपालांना पत्र लिहून, राज्यपालांनी पंतप्रधानांना देऊन आरक्षण मिळणं इतकं सोप्प असत तर भाजपने केलं नसत का, पंतप्रधानांची भेट मागून एका भेटीत आरक्षणाचा विषय संपणार असता तर भाजपने कधीच केले असते. मूळ प्रक्रिया डावलायची आणि त्याचे खापर केंद्रावर फोडत, केंद्रावर बोट दाखवण्यासाठी खोतचित्र उभं करायचं अशी सोची समझी भूमिका महाविकास आघाडी ठाकरे सरकारची आहे. राज्याला कायदा बनवण्याचा अधिकार आहे. या संदर्भात स्वतः सहभागी होऊन याचिका केली मग केंद्राची भूमिका स्पष्ट होत असताना आपण का मागास-वर्गीय गटीत करत नाही ? जी पुरावे फेटाळले ती पुनः का दस्तावेज करत नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. सक्षमतेने मागासवर्गीय आयोग नेमून प्रक्रिया विधिमंडळासमोर आणणं, विधिमंडळात जाऊन प्रक्रिया सांगण किमान राज्यपालांच्या मार्फत केंद्रीय आयोगाला पाठवणे, राष्ट्रपतींकडे पाठवून त्या मागासलेल्या जातीमध्ये समावेश करणे अशी हि प्रक्रिया न करता केवळ एकमेकांची उणीधुणी काढत भाजप आणि केंद्र सरकार आरक्षणाला जबाबदार आहे अशा प्रकारचं बोगस, ढोंगीपणा करण्याचा माविआचा प्रयत्न आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. तर यावेळी बोलताना आ.प्रशांत ठाकूर म्हणाले की, मराठा समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे गरजचे असताना महाविकास आघाडी सरकार नेहमी प्रमाणे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे त्याविरोधात महाराष्ट्रात संतप्त भावना दिसत आहेत. स्वतःची जबाबदारी केंद्र आणि भाजपवर ठाकलण्याचे काम केले जात आहे. आणि हे जाणून बुजून केले जात आहे. मराठा समाजातील तरुणांना आणि संघटनांना आश्वस्त करण्याच्या दृष्टिकोनातून भाजप सकारात्मक भूमिका मांडत आहे.

## समाजाच्या आंदोलनाला सुरुवात : संभाजीराजे

म्हणाले की, मी २००७ पासून मराठा समाजाच्या आरक्षणासाठी महाराष्ट्र पिंजून काढला. माझा लढा हा ७० टक्के गरीब मराठ्यांसाठी आहे. मराठा समाज हा सामाजिक मागास नाही, म्हणून आरक्षण देता येणार नाही असं सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं. त्याचं सर्वांनाच दु:ख झालं. आता कोण चुकले कोण बरोबर याच्यावरुन मागचे सरकार आणि आताचे सरकार यांच्यात वाद सुरु आहे. या वादाशी आम्हाला काही घेणं-देणं नाही, मराठा समाजाला आरक्षण कसं देणार ते सांगा.

काही दिवसांपूर्वी आपण राज्य सरकारला तीन पर्याय दिले होते असं सांगत संभाजीराजे म्हणाले की, रिव्ह्यू पिटीशन लोकांना दाखवण्यासाठी फाईल करू नका तर फुलप्रुफ असावा हा पहिला पर्याय. दुसरा पर्याय क्युरिटीव्ह पिटीशन हा आहे आणि तिसरा पर्याय घटना कलम ३४२-ए नुसार राज्यपाल यांच्याकडे प्रस्ताव जाईल तो पुढे राष्ट्रपती आणि त्यानंतर संसदेकडे जाईल आणि त्यातून आरक्षण मिळणं शक्य आहे. या व्यतिरिक्त ९ सप्टेंबर २०२० च्या आधी झालेल्या नियुक्त्या करुन टाका, याला सर्वोच्च न्यायालयाचा काही आक्षेप नाही. राज्याच्या हातात असलेली गोष्ट त्यांना द्यायला काय हरकत आहे. यामुळे जवळपास दोन हजार नियुक्त्या रखडल्या असल्याचं संभाजीराजेंनी सांगितलं. आरक्षण हा मराठा समाजाचा हक्क आहे आणि मराठा समाजाला न्याय मिळवून दिल्याशिवाय आता गप्प बसणार नाही असं संभाजीराजे म्हणाले. येत्या १६ जूनपासून कोल्हापूरातील राजर्षी शाहू महाराजांच्या समाधीपासून आंदोलन सुरु करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

देशातील लोकांना पहिलं स्वातंत्र्य हे शिवरायांनी मिळवून दिलं. त्यामुळे शिवराज्याभिषेक सोहळा हा राष्ट्रीय सण म्हणून साजरा करावा अशी मागणी संभाजीराजे छत्रपतींनी केली. रायगड किल्ल्याचं संवर्धन चांगल्या प्रकारे सुरु असल्याचं संभाजीराजे यांनी सांगितलं. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सुमारे ३५० वर्षांनी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त 'सुवर्ण होनांनी' अभिषेक करण्यात आला आहे. यावेळी संभाजीराजे छत्रपतींनी हा आपल्यासाठी आणि राज्यासाठी एक सुवर्ण क्षण असल्याचे त्यांनी म्हटलं आहे. शिवरायांचे हे होन देशातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचं आवाहन त्यांनी शिवभक्तांना केलं.

## नगरसेवकांना बळकटी देणार : आ.प्रशांत ठाकूर

प्रमुख उपस्थितीत बिना कदम, संदीप कदम, अशोक शिंदे, त्रिभुवन तिवारी यांनी पक्ष प्रवेश केला तर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्ताने मोदी भोजन कम्युनिटी किचन या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील अनेक भागात जवळ जवळ एक लाख गरजू लोकांपर्यंत मोदी भोजन कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळे पोचवले गेले आहे. आमच्या पक्षावर विश्वास टाकून प्रवेश केलेल्या माथेरान मधील नगरसेवकांच्या भारतीय जनता पक्ष सोबत आहे. येणाऱ्या काळात पर्यटन व्यवसायाशी निगडीत अडचणी ,वाहतूक व्यवस्थे संदर्भातील समस्या, तसेच येथील घरांना अधिकृत करण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले जाईल त्याचबरोबर नागरी समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला जाईल. आपण केलेले परिवर्तन समाजाच्या हितासाठी आणि माथेरानच्या विकासासाठी आहे. यासाठी जे प्रत्यक्ष बोलतो ते करत राहून एक नवा बदल घडवून आणण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध आहे.असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमावेळी उपस्थितांना संबोधित केले.

याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळ्या निमित्त माथेरान नौरोजी लॉर्ड उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराज अर्ध पुतळ्यास, वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या पुतळ्यास तसेच हुतात्मा स्तंभास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कर्जत तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, माथेरान शहराध्यक्ष विलास पाटील,उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, प्रविण सकपाळ, कुलदीप जाधव, प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव,रायगड जिल्हा चिटणीस रमेश मुंढे , संजय भोसले, आनंद सकपाळ,किरण ठाकरे, दीपक बेहरे,बळवंत घुमरे,ऋषिकेश जोशी , ग्रामपंचायत सदस्य नेरळ संतोष शिंगाडे राजन लोभी,अनिल जैन ,अनिल पटेल , राजेश भगत , शैलेंद्र दळवी, अरविंद शेलार,संजय कराळे तसेच नगरसेवक, नगरसेविका ,पदाधिकारी व बहुसंख्य नागरीक उपस्थित होते.

## शिवस्वराज्य दिन जिल्ह्यात उत्साहात साजरा

कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) शीतल पुंड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पाणी व स्वच्छता) ज्ञानदा फणसे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दत्तात्रय पाथरूट, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी बंकट आर्ले, जिल्हा कृषी विकास अधिकारी लक्ष्मण खुरकुटे,आदी जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचारी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# गडब - काराव येथील नियोजित ग्रामीण रुग्णालयाच्या जागेची पालकमंत्री आदिती तटकरे यांनी केली पाहणी



**दै.रायगड नगरी । पेण**

पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्याचा ध्यासच घेतला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी आज पेण तालुक्यातील काराव- वडखळ येथील नियोजित ग्रामीण रुग्णालयाच्या जागेची पाहणी केली.

पालकमंत्री कु. आदिती तटकरे या पूर्वी मंजूर झालेली आरोग्य केंद्र, उप आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय याबाबतच्या विकासात्मक कामांवर धडाडीने लक्ष देत आहेत. या पार्श्वभूमीवर आरोग्य केंद्रांना शासकीय जागा देणे, त्यांचे बांधकाम करणे, या आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करून देणे, वैद्यकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आदी बाबींचा त्या सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, तहसिलदार डॉ.अरुणा जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

# पोलादपूरचे शहिद राकेश सावंत यांचा स्मृतीदिन साजरा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर पोलादपूर येथील शहिद राकेश तात्याबा सावंत यांचा स्मृतीदिन कौटूंबिक पातळीवर आप्तपरिवाराच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. शहिद परंपरा असलेल्या पोलादपूर तालुक्यातील सेवाकाळात युध्दभूमीवर अपघाती वीरमरण आलेल्या शहिद राकेश सावंत यांच्या परिवाराने यावर्षी या स्मृतीदिन कार्यक्रमाचे मर्यादित आयोजन करून सामाजिक बांधिलकी दर्शविली.

दि. ६ जून २००९ रोजी युध्दक्षेत्रात सेवेत असताना वाहन अपघातात शहिद झालेले राकेश तात्याबा सावंत यांच्या प्रथम स्मृतीदिनी रायगड जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्क्वॉर्डन लिडर दीपक नाईक यांच्या उपस्थितीत शहिद राकेश सावंत यांचा पुतळा सावंतकोंड येथील त्यांच्या निवासस्थानी बसविण्यात आला. यानंतर त्यांच्या निवासस्थापासून सावंतकोंड रस्त्यापर्यंत जोडरस्ता करण्यात येऊन गेल्या वर्षी कमानही उभारण्यात येऊन लोकार्पण करण्यात आले.



आज रविवारी वीरपिता तात्याबा सावंत आणि वीरमाता यांनी त्यांच्या वीरपुत्राचा १२ वा स्मृतीदिन कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर अत्यंत साधेपणाने व कौटूंबिक पातळीवर आयोजित करण्याचा निर्णय घेतला आणि गर्दी टाळून सामाजिक बांधिलकी दर्शविली. यावेळी परिसरातील ग्रामस्थ व आप्तपरिवार आवर्जून उपस्थित होता.

# बळीराजाची भात बियाणे खरेदीसाठी लगबग सुरु

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

कोकणातील मुख्य व्यवसाय शेती करणे हा असुन,कोकणातील बळीराजा हा रोहिणी नक्षत्रात भात पेरणीला सुरुवात करीत असतो.यासाठी पेरणीसाठी लागणारे विविध जातीचे भात बियाणे खरेदीसाठी कृषिकेंद्रावर गर्दी दिसुन येत आहे.व शेतीची पुर्व मशागतीची कामे आटपुन बळीराजा भात पेरणीसाठी सज्ञ झाला आहे.

हवामान खात्याकडून देण्यात आलेल्या माहिती नुसार यावर्षी पाऊस वेळेवर सुरु होत असुन तो महारष्ट्रात दोन ते तीन दिवसात सुरु होईल असा अंदाज वर्तवला जात आहे.परंतु पाऊस वेळेवर पडो अथवा न पडो यावर बळीराजा न थांबत पेरणी करीत असतो.यामुळे बळीराजा हा आपली मशागतीची कामे पुर्ण करुन भात पेरणीसाठी सज्ञ झालेला दिसत असतो.

पूर्वी पासुन आपला उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असलेला कोकणातील शेतकरी वाता-वरणाची परिस्थिती कोणत्याही प्रकारची असली तरी आपल्या शेतीची पुर्व मशागतीची कामे आटपुन पेरणीसाठी सज्ञ होतो.त्यामुळे रब्बी हंगामात पेरणी करणे हे पावसावर अवलंबून असले तरी येथील बळीराजा रोहिणी नक्षत्रात पेरणी करीत असतो यामुळे पेरणीसाठी लागणारे विविध प्रकारचे भात भात बियाणे खरेदी करुन येथील शेतकरी वर्ग भात पेरणीसाठी सज्ञ झालेला दिसत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पालीकर अजूनही शुद्ध पाण्याच्या प्रतिक्षेत

## १५ ते २० वर्षे उलटली तरी सुमारे १२ कोटींची शुद्ध नळपाणी पुरवठा योजना लालफितीत

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायकापैकी एक तिर्थक्षेत्र असलेल्या पाली शहराला अंबा नदिचे पाणी कोणतीही प्रक्रिया न करता पुरविले जाते. तब्बल १५ हजाराहून अधिक लोक या पाण्यावर अवलंबून आहेत. मात्र अंबा नदीचे पाणी सांडपाणी, शेवाळ व केमिकलमुळे प्रदूषित झाले आहे. शोकांतिका म्हणजे पाली शुद्ध नळपाणी पुरवठा योजना मागील १५ ते २० वर्षांपासून प्रलंबित आहे. सद्यस्थितीत तब्बल १२ कोटींची शुद्ध नळपाणी योजना लालफितीत अडकली आहे. ही रक्कम आणखी वाढण्याची शक्यता देखील आहे.

अंबा नदीच्या पाण्यात पावसाळ्यात गाळ व चिखलाचे प्रमाण अधिक असते. तर नंतर मोठ्या प्रमाणात हिरवळ व शेवाळ असते. साप, मासे, शिंपले नळाद्वारे थेट येतात. तसेच नाले व गटारांमधील प्रदुषित सांडपाणी, रासायनिक कंपन्यांमधील टाकऊ रसायन हे आंबा नदीत सोडले जाते. या बरोबरच कचरा आणि घाण देखिल साठते. नदिवर महिला कपडे व भांडी धुतात. तसेच नदित निर्माल्य देखील टाकले



जाते. यामुळे अंबा नदीचे पाणी प्रचंड प्रमाणात प्रदूषित व खराब होते. या सर्वांमुळे पाण्याला उग्र स्वरुपाची दुर्गंध येते, चवही खराब लागते. असे पाणी प्रदुषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. परिणामी बहुसंख्य नागरिक अधिकचे पैसे खर्च करुन पिण्याच्या पाण्यासाठी बाटलीबंद पाण्याचा आधार घेत आहेत.

शासनाने केलेल्या २००८ – ०९ च्या सर्व्हेनुसार पालीची लोकसंख्या व पालीत दररोज येणार्या भाविक व पर्यटकांच्या संख्येनुसार शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेचे नियोजन केले होते. एकूण ७ कोटी ७९ लाखाचा निधी व १० टक्के लोकवर्गणी द्वारा नळयोजना उभी राहणार होती. परंतू राजकीय श्रेयवादामध्ये हि योजना रखडली गेली. त्याबरोबर १० टक्के लोकवर्गणीचा प्रश्न देखिल होता. मात्र पालीला ''ब'' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळाला आहे. तसेच शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेसाठी ११ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजुर झाला आहे. लोकवर्गणीची अट शिथील करण्यात आली आहे. पण अजुनही हि योजना कार्यान्वित होऊ शकलेली नाही. सर्वच राजकिय पक्ष व त्यांचे पुढारी या योजनेचे निवडणूकी पुरते भांडवल करतांना दिसतात.

अंबा नदिजवळील जॅकवेलमध्ये असलेल्या पंपांद्वारे पाणी सरगडाच्या पायथ्याशी असलेल्या चार साठवण टाक्यांमध्ये सोडले जाते व तेथून सर्व पालीत पाणी पुरवठा केला जातो. तर काही भागात नदीतून थेट पाणी पुरवठा केला जातो. मात्र जॅकवेल ते साठवण टक्या यांच्या दरम्यानचे मोठे अंतर, वाहिन्यांचा छोटा आकार, वारंवार फुटणाऱ्या लहान, जुन्या व जिर्ण झालेल्या जलवाहिन्या, साठवण टाक्यांची दुरवस्था, सतत बिघडणारे व अपुर्या क्षमतेचे पंप, जॅकवेलमध्ये गाळ साठणे, जुने वॉल फुटणे, मुख्य जल वाहिनीला जोडलेल्या इतर वाहिन्या, वारंवार खंडित होणारा विज पुरवठा व अपुरे कर्मचारी अशा असंख्य कारणांमुळे पालीत नेहमी पाणी टंचाई भेडसावते. नळपाणी योजना झाल्यास ही समस्या निकाली निघू शकते.

# संक्षिप्त...

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या जिल्हा समन्वयकपदी रमेश म्हात्रे

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या रायगड जिल्हयाच्या समन्वयकपदी ग्राहक संरक्षण कक्षाचे जिल्हाप्रमुख रमेश म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे.शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गरीब, गरजू व आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयात १० टक्के खाटा उपलब्ध करून देणे, निकषात बसत असलेल्या गरीब रुग्णांवर पुर्णतः मोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्या संदर्भातील मदत तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणी असलेल्या रुग्णालयामध्ये गरजू रुग्णांना शस्त्रक्रिया मोफत करणे संदर्भात मार्गदर्शनासाठी तत्पर असणे.

महागड्या शस्त्रक्रिया करावयाच्या असलेल्या गोर गरीब गरजू रुग्णांना भरीव प्रमाणात अर्थ साह्य याकरिता पंतप्रधान वैद्यकीय साहयता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय साहयता निधी व विविध ट्रस्टच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी थेट शिवसेना भवन येथील मुख्य कार्यालयास किंवा ठाणे येथील कोपरी मध्यवर्ती कार्यालयात संपर्क साधून मदत मिळविणे असे आवाहन शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी केले.

## माती परीक्षणानुसारच भात व फळपिकांना खत व्यवस्थापन करावे : सुरज पाटील

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

कोकणातील शेतकऱ्यांनी माती परिक्षण केल्यानंतरच भात पिक तसेच फळपिकांना खत देण्यासंदर्भात व्यवस्थापन करण्याची गरज असल्याचे मत पोलादपूर तालुका कृषी कार्यालयाचे मंडळ कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी गोळेगणी येथे व्यक्त केले. ही काळी आई... धनधान्य देई... जोडते मनाशी नाती.. ही आमची माती... काही वर्षांपूर्वी हे गीत सर्वांच्या मुखात होते. कारण बळीराजाने शेताशी आईचे नाते जोडले होते. पण आता सधन कृषी पद्धतीत रासायनिक खतांच्या अनिर्बंधित वापरामुळे व अन्य कारणांमुळे या भूमातेचे आरोग्य बिघडत चालले आहे. त्याचा पीक उत्पादनावर विपरित परिणाम होऊ लागला आहे. भूमातेचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी मृद तपासणीवर आधारित खतांच्या संतुलित तसेच परिणामकारक वापरास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे असे कृषी मंडळ अधिकारी सुरज पाटील यांनी शेतकरी वर्गाला सांगितले. कृषी विभागातर्फे मंडळ कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे व कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करून दाखविले.

## नागोठण्यातील डेडिकेटेड कोविड केअर सेंटरची ना. आदिती तटकरेंकडून पाहणी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेडच्या नागोठण्यातील युनिट कडून नागोठण्याजवळील पिगोंडे ग्रामपंचायत हद्दितील वेलशेत गावालगतच असलेल्या व बंद स्थितीत असलेल्या सन पेट्रोकेमिकल्स कंपनीच्या जागेत सुमारे २०० बेड्सची क्षमता असलेले डेडिकेटेड कोविड केअर सेंटर उभारण्यात येत आहे. याच डेडिकेटेड कोविड केअर सेंटरची पाहणी रायगडच्या पालकमंत्री ना. आदितीताई तटकरे यांच्याकडून शुक्रवार दि. ४ जून रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.



जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, रोहाचे प्रांताधिकारी डॉ. यशवंतराव माने, रोहाच्या तहसीलदार कविता जाधव, रिलायन्स इंडस्ट्रीज लि. या कंपनीच्या नागोठणे युनिटचे अध्यक्ष अविनाश श्रीखंडे, उपाध्यक्ष व एच.आर. विभागाचे प्रमुख चेतन वाळंज, जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे, पिगोंडे ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष कोळी आदींसह अनेक मान्यवर व राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोरोनाची तिसरी लाट अधिक तीव्र असल्याचे मत तज्ञांनी व्यक्त केले असून लहान बालकांना याचा जास्त धोका असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळेच २०० बेड्सची क्षमता असलेल्या या कोविड केअर सेंटरमध्ये तिसऱ्या लाटेच्या या अनुषंगाने येथे लहान मुलांसाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येत आहे. याशिवाय या कोविड केअर सेंटर मध्ये रूग्णांना आवश्यक सर्व सोयी सुविधा, वैद्यकीय सामुग्री उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## कर्जत-माथेरान मिनीबस सेवा सुरू करावी : प्रेरणा सावंत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कोरोना या महामारीमुळे सर्वत्र जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर वाहतूक व्यवस्था सुध्दा पूर्णतः कोलमडून गेली आहे. तर कोव्हीड –१९ च्या वाढत्या प्रादुर्भाव मुळे कर्जत ते माथेरान ही मिनीबस सेवा सुध्दा बंद करण्यात आली आहे. परंतु सध्या तरी महाराष्ट्र राज्य सरकारने राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस बहुतांश ठिकाणी सुरू केल्या आहेत. माथेरान ह्या ठिकाणी नागरिकांना आपल्या दैनंदिन जीवनातील व्यवहारात या बंद करण्यात



आलेल्या बस सेवेमुळे खूपच अडचणी निर्माण झाल्या आहेत. खाजगी वाहनाने प्रवास करणे खूपच त्रासदायक आणि अवाजवी दरामुळे स्थानिकांना कर्जत अथवा अन्य ठिकाणी जाता येत नाही याकामी लवकरच कर्जत ते माथेरान ही मिनीबस सेवा पूर्वपदावर आणण्यासाठी प्रयत्न करावेत या आशयाचे निवेदन नगराध्यक्ष प्रेरणा प्रसाद सावंत यांनी कर्जत आगार व्यवस्थापक यांना सुपूर्द केले आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## जागतिक पर्यावरणदिनी आर्या वनौषधी तर्फे वनौषधी रोपांचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक पर्यावरणदिनाचे औचित्य साधून आर्या वनौषधी संस्थेच्यावतीने वनौषधी रोपांचे वाटप करण्यात आले. या वेळी नागरिकांना वनौषधींची माहिती असलेली माहिती पत्रके वाटप करून जनजागृतीही करण्यात आली.

सदर कार्यक्रमात आर्या पाटील, जागृती पाटील यांच्या हस्ते डॉ.स्नेहा केणी,सेंट मेरी स्कुलच्या मुख्याध्यापिका मीना मॅडम, आरती ओझा आदी मान्यवरांना वनौषधींची रोपे भेट देण्यात आली. या वर्षीही संस्थेच्या सदस्यांनी नागरिकांच्या घरी जावून त्यांना वनौषधी रोपे भेट दिली. या मध्ये सफेद मुसळी, अश्वगंधा, दमवेल, अर्जुन, पर्णबीज, केवडा, चित्रक, सीतेचा अशोक, बेल आदीचा समावेश होता. आर्या वनौषधी संस्थेच्या या जनजागृती कार्यक्रमात वनौषधी तज्ञ सुधीर पाटील यांनी सांगितले की, पर्यावरण दिन केवळ ५ जून पर्यत मर्यादित न राहता त्यातील संदेशाचे मोल वर्षभर राहावे. प्रत्येक नागरिकांनी पर्यावरण दिनाची सुरुवात आपल्या घरापासून करावी. तुम्हांला पृथ्वीसाठी जे जे चांगले करता येईल ते ते सारे करा. खरं तर येणारा प्रत्येक दिवस हा जागतिक पर्यावरण दिवस असतो. जागतिक पर्यावरण दिन केव्हा येईल याची वाट पाहण्याची गरजच नाही. सर्वांनीच पर्यावरण रक्षणासाठी वचनबद्ध राहिले पाहिजे.

## उत्तम तरकसे पर्यावरण रक्षक सन्मानपत्र द्वारा सन्मानित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वैश्विक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत वेद फाउंडेशन द्वारा १००८ तुळसी रोपांचे आज वितरण करण्यात आले. याप्रसंगी पोलीस दलातील उत्तम तरकसे यांना संस्थेच्या वतीने पर्यावरण रक्षक सन्मानपत्र द्वारा सन्मानित करण्यात आले. यावेळी आयकर विभागातील विलास देवळेकर, शैक्षणिक विभागातून सौ. मंजू सराठे, सामाजिक क्षेत्रातून मंगेश रासम इत्यादी गणमान्य व्यक्ती उपस्थित होत्या. संस्था अध्यक्ष स्वप्नील वाडेकर यांच्या संकल्पनेतून पुढील सप्ताह गरजवंतांना तसेच मध्यमवर्गीयांना तुळशीचे औषधी रोप वितरित करण्यात येणार आहे.

## पावसात दुर्घटना घडल्यास तातडीने संपर्क करा : उमाकांत सकपाळे

**दै.रायगड नगरी । पेण**

यंदाचा पावसाळा सुरू होण्यापूर्वीच चक्री वादळाचा फटका बसल्यानंतर विद्युत मंडळाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. ही कामे युद्धपातळीवर करत असतानाच तोंडावर आलेल्या पावसाचा सामना करण्यासाठी आणि ग्राहकांना चांगल्या प्रकारे सुविधा पुरविण्यासाठी पेण विद्युत मंडळ सज्ज झाले असून पावसाळ्यात कोणत्याही ठिकाणी पोल उन्मळून पडणे किंवा विद्युत तार पडणे अशा प्रकारची दुर्घटना घडल्यास त्या ठिकाणी स्पर्श न करता त्वरित विद्युत मंडळाशी संपर्क साधण्याचे आवाहन विद्युत मंडळाचे उपकार्यकरी अभियंता उमाकांत सकपाळे यांनी ग्राहकांना केले आहे.

नुकत्याच झालेल्या चक्रीवादळात उन्मळून पडलेल्या झाडांची छाटणी, तसेच वाकलेले ७० ते ७५ पोल पुन्हा उभे करणे, कंडक्टर ओढणे आदी कामे पेण विद्युत मंडळाने पावसाळ्यापूर्वी करून घेतली आहेत. त्याशिवाय गेली अनेक वर्षे पेणच्या मुख्य बाजारपेठेत असणारे सडलेले पोल देखील विद्युत मंडळाने बदलले असल्याची माहिती उमाकांत सकपाळे यांनी दिली. त्याचप्रमाणे जरी पावसापूर्वी सर्व तयारी केली असली तरी सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला आणि एखादी दुर्घटना घडली तर त्यासाठी आमचा पूर्ण स्टाफ आणि संबंधित ठेकेदारांना सज्ज राहण्याचे आदेश देखील दिले असल्याचे सकपाळे यांनी सांगितले.

दरवर्षी डोकेदुखी ठरणारे बाजारपेठेतील ३ सडलेले पोल बदलण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे इतर ठिकाणावरील तारा खेचणे, झाडांची छाटणी करणे आदी कामे करून आम्ही आमचा स्टाफ आणि संबंधित ठेकेदार सज्ज ठेवले आहेत. ग्राहकांनी कोणतीही विद्युत संदर्भात दुर्घटना निदर्शनास आल्यास आमच्याशी तातडीने संपर्क साधावा.

**-उमाकांत सकपाळे -**
**उपकार्यकारी अभियंता, पेण**


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the 'Scheduled Property' mentioned hereunder is owned by and is in actual physical possession of Mr. Rajesh Sitaram Ghodinde and Mrs. Sapna Rajesh Ghodinde, residing at- Room no. 2, F-Wing, Manek Nagar, Old Panvel-410206, (hereinafter referred as 'Owners'), as the sole and absolute right, title and interest holders thereof. The Owners claim that their rights are free from all encumbrances, charges, claims, etc. of whatsoever nature and that they have a clear and marketable title in respect of the 'Scheduled Property'. This public notice is issued for verification of the title of the 'Owners' with respect to the 'Scheduled Property'.

All or any persons including any banks, financial institutions or any other party or person, having any valid and legal claim, right, title, demand or interest by virtue of any sale, gift, lease, tenancy, license, exchange, partition, mortgage, charge, lien, inheritance, succession, trust, maintenance, possession, easement, agreement, lis-pendence, stay order, attachment, decree, specific performance or otherwise or any other right of whatsoever nature are required/ called upon to convey their objection/s in writing at the address mentioned below, within (14) Fourteen days from issuance of this notice, along with all supporting documents relating to such claim, failing which it shall be presumed that there is /are no claim/s and such claim/s if any, shall be considered to be waived and abandoned in respect of the 'Scheduled Property'.

**'SCHEDULED PROPERTY'**

All that piece and parcel of residential tenement bearing Flat No. 02, admeasuring about 502 Sq. Mts. built-up area, situated on Ground floor of the building 'Manek Nagar', maharana Pratap Marg, Taluka-Panvel, District-Raigad and within the limits of the Panvel Municipal Corporation.

Hence this Notice.
At Panvel
Date: 06/06/2021

Sd/-
Mr. Rajesh SitaramGhodinde
981907120



सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, द्रोणागिरी येथील खालील नमूद केलेली जमीन **मूळ भूधारक १) कै. एकनाथ सावळाराम ठाकूर (मयत) व कै. कृष्णाबाई एकनाथ ठाकूर यांचे वारस १) श्री. प्रभाकर एकनाथ ठाकूर २) श्री. ज्ञानेश्वर एकनाथ ठाकूर ३) सौ. रंजना तानाजी कलाल ४)सौ. विठाबाई मधुकर म्हात्रे ५) सौ. रेखा सुदाम वासकर ६) श्री. संजय एकनाथ ठाकूर २) कै. गोपाळ सावळा उर्फ सावळया उर्फ सावळाराम ठाकूर (मयत) यांचे वारस १) श्री. पांडूरंग गोपाळ ठाकूर २) श्रीमती तारा जनार्दन मढवी** यांच्या कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई उपरोक्त भूधारकांनी स्वीकारली असून, संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

| गावाचे नाव /संचिका क्र. | निवाडा क्र. | संपादित सर्व्हे क्र. / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे. आर) | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| शेमटीखार/ १६७६ | शेमटीखार/ २१/९१-९२ | ४५/७ | ०-११-४ | द्रोणागिरी | ५३ | २०७ | १०० चौ. मी. |

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार **द्रोणागिरी येथील सेक्टर क्र. ५३, भूखंड क्र.२०७, क्षेत्र-१०० चौ.मी.** या भूखंडाचे इरादापत्र भूधारकांस देण्यात आलेले आहे.

**निवाड्यानुसार व सी.सी. फॉर्म नुसार भूधारकांची नावे -**

| निवाड्याप्रमाणे भूधारकांची नावे पृष्ठ क्र. २८३/प ते २८९/प | सी.सी. नुसार भूधारकांची नावे पृष्ठ क्र. २९१/प |
|---|---|
| गोपाळ सावळया ठाकूर<br>एकनाथ सावळया ठाकूर | गोपाळ सावळया ठाकूर<br>एकनाथ सावळया ठाकूर |

उपरोक्त भूखंड वाटपास **गोपाळ सावळा उर्फ सावळया उर्फ सावळाराम ठाकूर (मयत) यांचे कायदेशीर वारस श्री. पांडूरंग गोपाळ ठाकूर व श्रीमती. तारा जनार्दन मढवी तसेच एकनाथ सावळया ठाकूर (मयत) यांचे कायदेशीर वारस. श्री.प्रभाकर एकनाथ ठाकूर, श्री. ज्ञानेश्वर एकनाथ ठाकूर, सौ. रंजना तानाजी कलाल, सौ. विठाबाई मधुकर म्हात्रे,सौ. रेखा सुदाम वासकर व श्री. संजय एकनाथ ठाकूर हे असून या भूधारकांपैकी कै. एकनाथ सावळाराम ठाकूर (मयत) यांचे वारसापैकी श्रीमती विठाबाई मधुकर म्हात्रे, सौ. रंजना तानाजी कलाल, सौ. रेखा सुदाम वास्कर यांनी श्री. प्रभाकर एकनाथ ठाकूर, श्री. ज्ञानेश्वर एकनाथ ठाकूर, श्री. संजय एकनाथ ठाकूर** यांचे लाभात दुय्यम निबंधक, उरण यांचेकडे नोंदणीकृत हक्कसोड पत्र दिले आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| **कै. एकनाथ सावळाराम ठाकूर (मयत) व कृष्णाबाई एकनाथ ठाकूर (मयत) यांचे वारस-**<br>१) श्रीमती विठाबाई मधुकर म्हात्रे<br>२) सौ. रंजना तानाजी कलाल<br>३) सौ. रेखा सुदाम वास्कर | **कै. एकनाथ सावळाराम ठाकूर (मयत) व कृष्णाबाई एकनाथ ठाकूर (मयत) यांचे वारस-**<br>१) श्री. प्रभाकर एकनाथ ठाकूर<br>२) श्री. ज्ञानेश्वर एकनाथ ठाकूर<br>३) श्री. संजय एकनाथ ठाकूर |

उपरोक्त तक्त्यामधील (हक्कसोड) नुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच भूखंडाचे वाटप स्वीकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|
| १) श्री. प्रभाकर एकनाथ ठाकूर<br>२) श्री. ज्ञानेश्वर एकनाथ ठाकूर<br>३) श्री. संजय एकनाथ ठाकूर |

उपरोक्त इरादित करण्यात आलेल्या भूखंडा संदर्भात नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना त्यांच्या नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनीच्या बदल्यात लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, सातवा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत.

वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही, असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधीत गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल, अशा ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येईल.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०९३/२०२१-२२

# संक्षिप्त...

## इर्टिगा गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथील फेज-२ बी.जी.कंन्स्ट्रक्शन साईड येथे उभी करून ठेवलेली ४ लाख रुपयाच्या इर्टिगा गाडीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे. हरदिपसिंह मोहनसिंह रंधवा (६१) यांनी त्यांची ४ लाख रुपये किंमतीची मारुती सुझुकी कंपनीची इर्टिगा गाडी क्र.एमएच-४६-एबी-५२३० ही बी.जी.कंन्स्ट्रक्शन साईड फेज-२ तळोजा मॅकेनिकल ऑफिस समोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडी चोरुन नेल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका तरुणीस लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी एका इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ वर्षीय पिडीत तरुणीला लग्न करतो असे सांगून आरोपी सर्वेश शिंदे याने तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिच्यासोबत लग्न करण्यास नकार दिल्याने सदर तरुणीने त्याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मा.नगराध्यक्ष सईद मुल्ला यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**


जागतीक पर्यावरण दिनानिमित सीनीयर क्रिकेट टीम व पनवेल माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला च्या ७७व्या वाढदिवसानिमित तालुका क्रिडा केंद्र पनवेलच्या मैदानात वृक्षारोपणचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी आधार स्तभ ॲङ चंद्रशेखर वाङकर, संजय पाटकर यांच्यासह राजेश शेट्टीया, सुभाष पाटील, प्रफ्फुल पेङसे, सुखम हॉस्पीटलचे डॉ. सतोष जाधव, डॉ. ययाती गाधी, डॉ आशिष गाधी, डॉ मिलीद जोशी, सागर आटवणे, विजय पाटील, अप्पु कुभार, सचिन ङागरे, कुणाल सावंत, नितीन पाटील, प्रदिप पाटील, रवि घाङगे, केदार माने, अभिजीत पाटील, यशंवत पाटेकर, युसूफ पटेल, त्रिशुल म्हात्रे, प्रमोद पाटील, संदीप पाटील आदी उपस्थित होते.



# जुनी वैशिष्ट्ये जपून पनवेल शहर आदर्श बनविणार : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराची जुनी वैशिष्ट्ये जपून आदर्श बनविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सूतोवाच आमदार प्रशांत ठाकूर यांनी पर्यावरण दिनाच्या पूर्वसंध्येला केले. येथील निसर्ग मित्र संस्थेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणपूरक विकास आराखडा विषयावर शुक्रवारी (दि. ४) ऑनलाइन विचारमंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी आमदार ठाकूर बोलत होते. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त सुधाकर देशमुख, वास्तुविशारद सतीश कोळवणकर, सँच्युअरी नेचर फाऊंडेशनचे संचालक डॉ. परवीश पंड्या, ठाणे परिमंडळाचे मुख्य संरक्षक रामा राव, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्यासह निसर्ग संवेदनशील संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल शहर आदर्श बनविण्यासाठी पर्यावरणपूरक आराखडा बनवून या शहराची जुनी वैशिष्ट्ये जपण्याची जबाबदारी आपली असून त्यासाठी आपण सर्वांनी आपल्या सूचना दिल्यास त्याचा उपयोग होऊ शकतो. यासाठी ज्या संस्था काम करीत आहेत त्यांना शासकीय संस्थांनी सहकार्य करावे, असे आवाहनही केले. शाळेतील विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी करून घ्यावे. त्यासाठी त्यांना निरनिराळे प्रोजेक्ट द्यावे. त्यांना पर्यावरणाची माहिती होण्यासाठी पुढाकार घ्यावा. आपल्या चुका दुरुस्त करीत आपण पुढे जायला हवे, असे सांगून त्यांनी निसर्ग मित्र संस्था आणि सहभागी झालेल्यांचे आभार मानले. डॉ. परवीश पंड्या यांनी हा परिसर आपले दुसरे घरच असल्याचे सांगून पनवेल महापालिका हद्दीत खूप जैवविविधता आहे. ती जपून ठेवण्यासाठी आ-तापासूनच विकास आराखडा करणे गरजेचे आहे. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्रातील वनस्पती वाढवणे आवश्यक आहे. त्यामुळे मातीची क्वालिटी वाचवायची आहे, येथे येणारे पक्षी वाचवताना कबुतरखाने तयार करू नयेत. बिल्डिंग, खेळासाठी मैदान ठेवायचे हे आताच ठरवून ठेवले पाहिजेत. वृक्षांची उद्याने बनवू शकतो. निसर्गाची साखळी टिकवण्यासाठी पक्षी, फुलपाखरे आणि किडेही जरूरीचे असल्याचे म्हटले. निसर्गाचा आनंद घेण्यासाठी पनवेलला येत असतो, असे सांगून वास्तुविशारद सतीश कोळवणकर यांनी वृक्ष कशा पद्धतीने वाढली यावर त्याचे सौंदर्य अवलंबून असते. पक्षी तेथे आनंदाने राहत असतात. शहराच्या जैववैविधतेसाठी शहराचा नकाशा तयार करताना तेथील पाण्याचे सोर्स, डोंगर-दर्या लक्षात घेऊन तेथे कोणती झाडे लावावी हे ठरवता येईल. कोणती झाडे कोठे लावावी व वृक्ष डेरेदार दिसण्यासाठी पूर्वनियोजन करून आराखडा तयार करावा. घनकचरा व्यवस्थापनाचा याच्याशी संबंध येत असल्याचे सांगून त्यांनी कचरा म्हणजे दोन वेगळ्या गोष्टी एकत्र येतात तेव्हा कचरा निर्माण होतो असे सांगत ओला कचरा, सुका कचरा, रिजेक्ट वेस्ट (केमिकल आणि औषधी साहित्य) व डेब्रिज (बांधकामातील दगड, विटा) हे त्याचे प्रकार असल्याचे सांगितले. तो वेगवेगळा गोळा करून निर्मूलन केल्यास त्यावर पुनर्वापर प्रक्रिया केल्यास डम्पिंग यार्डची गरज राहणार नाही. त्यासाठी पालिकेने तो वेगवेगळा गोळा करून त्या त्या रिसायकलिंग सेंटरवर नेणे आवश्यक आहे. महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी जागतिक पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा देऊन पनवेल महापालिकेने पर्यावरण रक्षणाचे काम सुरू केले आहे. त्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. तिच्या दोन बैठकाही झाल्याची माहिती देऊन विकास आरखडा तयार करताना पर्यावरण रक्षणाबाबत होणार्या. चर्चेत निसर्ग मित्र संस्थेने सहभागी व्हावे, असे सांगितले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आदर्श पनवेल हे स्वप्न आहे ते पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. आज त्याची चांगली सुरुवात झाली असल्याचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सांगितले. या वेळी त्यांनी मुंबईत भाडे घेऊन जाणारे ट्रक महानगरपालिका हद्दीत कसे डेब्रिज टाकतात त्याचा त्रास होतो. त्याची विल्हेवाट लावणे गरजेचे असल्याचे सांगितले. तळोजा एमआयडीसीमुळे होणारे वायूप्रदूषण रोखण्यासाठीही काम करण्याची गरज आहे. आपल्याकडे दोन वर्षांत आलेल्या वादळानेही पर्यावरणाचे नुकसान झाल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. शासकीय संस्था या कामात कमी पडत असल्याने सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. महापालिकेचा विकास आरखडा महत्त्वाचा असून त्यासाठी पर्यावरणाचा प्राधान्यक्रम ठरविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. निसर्ग मित्र संस्थेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणपूरक विकास आराखडा हा चांगला विचार चर्चेला घेतला असून पर्यावरणाचे नुकसान होण्यास मानवी वस्ती जबाबदार असल्याचे आयुक्त सुधाकर देशमुख यांनी सांगितले. पर्यावरणाचा विकास आणि संवर्धन या दोन गोष्टी हातात हात घालून चालण्याऐवजी विकासाची व्याख्या वेग-वेगळी असल्याने विरोधात चालताना दिसतात. पनवेल महापालिकेचा आराखडा बनवत असताना ही चर्चा होत असल्याने त्याचा फायदाच होणार आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक विकास आराखडा करण्याचा प्रयत्न करून पनवेल शहर निसर्गरम्य बनविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## गाडीला ठोकर मारल्याच्या वादातून चालकाला जबरी मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

टाटा इंडिगो गाडी घेवून जात असलेल्या चालकास दुसऱ्या गाडीची ठोकर बसल्याने झालेल्या वादावादीतून काही जणांनी सदर चालकाला मारहाण केल्याची घटना तळोजा फेज-०१ सेक्टर १० मधील भुयारी मार्गाच्या जवळ घडली आहे.

मोहम्मद सर्फराज एकराम शेख (३३ रा.तळोजा) हे त्यांच्या ताब्यातील टाटा इंडिगो गाडी घेवून तळोजा फेज-१ येथे घरी येत असताना उजव्या बाजूला वळण घेत असताना डाव्या बाजूने ओव्हरटेक करणाऱ्या होंडा गाडीची ठोकर त्यांच्या गाडीच्या डाव्या बाजूस लागून अपघात झाला. यावेळी त्यांची दुसऱ्या गाडीतील विरोधकांबरोबर बाचाबाची झाली. रागाच्या भरात विरोधकांनी त्यांच्या गाडीतून हॉकिस्टीक काढून मोहम्मद शेख यांना मारहाण केली तसेच त्यांचा मोबाईल फोडून टाकला व त्यांच्या गाडीच्या दरवाजाच्या काचा फोडून त्यांच्या गाडीचे नुकसान केले.

## मुरुड तालुक्यात कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे प्रशासन सतर्क

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यात कोरोना बाधित रुग्ण वाढत चालले आहेत दररोज ४५ ते ५० या संख्येत रुग्णवाढ होत असू हि चिंतेची बाब आहे.

तसेच मृत्यूची संख्याही वाढत चालली आहे, कोरोना संसर्गावर आळा घालण्यासाठी नुकत्याच विरोधी पक्षनेते मंगेश दांडेकर यांच्या मागणीनुसार मुरुड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा स्नेहा पाटील यांनी आयोजित केलेल्या नियोजन बैठकीत प्रशासनाला कडक निर्बंध घालण्याचे आदेश दिले होते.

बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रशासन सतर्क झाले असून संचारबंदीमध्ये विनाकारण फिरणाऱ्या नागरिकांची अँटिजेन्ट चाचणी घेण्यात येत आहे व त्यामध्ये पॉझिटीव्ह रुग्ण आढळल्यास त्याच रवानगी कोविड सेंटर मध्ये करण्यात येत आहे. रुग्णसंख्येत रायगड जिल्हा चौथ्या टप्प्यात येत असल्याने लॉकडाऊनचे निर्बंध कायम ठेवण्यात आले आहेत.

त्याप्रमाणे मुरुड मधील नगरपरिषद प्रशासन व पोलीस यांच्यामार्फत शनिवार व रविवारी विकेंड लॉकडाऊन कडक पाळला जात असून नगरपरिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार गोविंद कोटंबे स्वतः मार्केटमध्ये आपल्या टीम सह फिरून कारवाई करीत आहेत. मुरुड मधील तिन्ही प्रवेश नाक्यावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवला असून येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. शुक्रवारी सायंकाळी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली समुद्रावर फिरण्यासाठी आलेल्या सुमारे २५ ते ३० स्थानिक नागरिकांवर पो-लीस ठाण्यात नेऊन कारवाई करण्यात आली. मुरुड तालुक्यात कोरोना संसर्ग वाढत असूनही अजून काही नागरिकांमध्ये जनजागृतीचा अभाव आहे.

तसेच काही लोक खोटी कारणे सांगून विनाकारण फिरण्याचा प्रयत्न करीत असल्याचे प्रवेश नाक्यावर बंदोबस्तास असलेले पोलीस सचिन वाणी यांनी सांगितले.

## उलवे येथे माजी शिक्षकांनी केला जागतिक पर्यावरण दिन साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, पर्यावरणाच्या समस्या व पर्यावरण संवर्धनाविषयी जणजागृती निर्माण करणे यासाठी जगभरात अनेक देशात दरवर्षी ५ जुन जागतिक पर्यावरण दिन साजरा होत असल्याने उलवे येथील वटवृक्ष सामाजिक संस्थेच्या मार्फत उलवे सेक्टर २४, श्री. हनुमान मंदिर तलाव परिसरात स्वच्छता अभियान हाती घेवुन आणि तेथील परिसरात आंबा, कडुलिंब, करंज, जांभुळ आणि काजू अशा देशी वृक्षांची निवड करुन आपल्या गावातील माजी शिक्षकांच्या शुभहस्ते रोपण करुन जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. संस्थेच्या माध्यमातून तलाव परिसरात विविध वृक्ष लागवडीचे कार्य चालुच असुन काही दिवसांतच तेथील मोकळ्या जागी वृक्ष लागवड कार्यक्रम हाती घेणार असल्याचे मत संस्थेचे अध्यक्ष किरण मढवी यांनी व्यक्त केले. यावेळी आदर्श शिक्षक मो. का. मढवी गुरुजी, ना. रा. गायकवाड गुरुजी, काशिनाथ तेलंगे गुरुजी, दत्तात्रेय कोळी गुरुजी, आदी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.



## आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर हे अध्यक्ष असलेल्या कोशिश फाऊंडेशनच्या वतीने चला करूया वृक्षारोपण हे अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानाचा शुभारंभ भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते खांदा कॉलनी येथील आयकर भवनजवळ करण्यात आला. या वेळी त्यांनी ही वसुंधरा सुंदर व्हावी यासाठी आपल्याकडून जे योगदान देता येईल त्यासाठी आपण सर्वांनी सज्ज व्हावे, असे आवाहन केले.



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ठिकठिकाणी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अंतर्गत कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून कोशिश फाऊंडेशनच्या वतीने खांदा कॉलनी येथील आयकर भवनसमोर चला करूया वृक्षारोपण या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती क सभापती हेमलता म्हात्रे, नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, नगरसेविका सीता पाटील, युवा नेते दशरथ म्हात्रे, शशिकांत शेळके, मोतीलाल कोळी, संजय जैन, ॲ ड. चेतन जाधव, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, परमेश्वर गिरे, चिन्मय समेळ, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, अभिषेक भोपी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कामोठ्यात अनैतिक संबंधातून एकाची हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बहिणीच्या अनैतिक संबंधातून ४ जणांनी मिळून एका इसमाला जीवे ठार मारल्याची घटना कामोठे येथील जुई गाव या ठिकाणी घडली आहे.

यातील आरोपी रोशनलाल उर्फ दिलीप गणेश साहू (२१ रा.जुई गाव), संदीप गणेश साहू (१९ रा.जुई गाव) यांची बहिण मीना साहू हिचे रोशन नावाच्या इसमाबरोबर अनैतिक संबंध होते. सदर अनैतिक संबंधांस त्यांचा विरोध होता. त्यामुळे त्यांच्या बहिणीच्या सांगण्यावरुन रोशन, मयत इसम बडे उर्फ लक्ष्मीकांत मिश्रा व त्याचा एक साथीदार यांनी संदीप साहू याच्या घरी जावून त्यास मारहाण केली होती. त्यामुळे सदर गोष्टीचा राग मनात धरुन रोशन, मयत बडे उर्फ लक्ष्मीकांत मिश्रा व त्यांचा एक साथीदार यांना धडा शिकवून त्यांना संपविण्याच्या उद्देशाने तिच्या दोघा भावांसह इतर दोघा मित्रांनी त्यांना चर्चा करण्यासाठी बोलावून त्यामध्ये मयत बडे उर्फ लक्ष्मीकांत मिश्रा यास पकडून त्या चौघांनी मिळून त्याला लाथाबुक्क्याने मारहाण करून तसेच एकाने त्याच्या छातीमध्ये चाकू भोसकून त्याला गंभीर दुखापत करून जीवे ठार मारुन ते पळून गेले आहेत. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात होताच सदर आरोपीचा शोध घेण्यासाठी वेगवेगळी पथके ठिकठिकाणी रवाना झाली आहेत.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल महापालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रत्येक प्रभागांमध्ये विविध ठिकाणी पिंपळ,कडूलिंब,कांचन, बकुळ अशी विविध प्रकारची जवळपास १०-२० झाडे लावण्यात आली. यावेळी वृक्ष लागवडीचा संकल्प करूया,पर्यावरणाचे संरक्षण करूया असा संदेश देण्यात आला.



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल प्रभाग समिती 'ड' तसेच महापालिका मुख्यालय अंतर्गत वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास मा. महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती 'ड' सभापती सुशीला घरत, उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, उपअभियंता सुधीर साळुंखे,अभियंता राजेश कर्डिले, प्रभाग अधिकारी हरिश्चंद्र कडू, तसेच कर्मचारी उपस्थित होते. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त खारघर प्रभाग समिती 'अ' अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करण्यात आला सदर कार्यक्रमाच्या वेळी सभापती अनिता पाटील ,नगरसेवक नगरसेवक प्रवीण पाटील,नरेश ठाकूर व प्रभाग अधिकारी दशरथ भंडारी, आरोग्य निरीक्षक अजय ठाकूर व सर्व कर्मचारी उपस्थित होते. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कळंबोली प्रभाग समिती 'ब' अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करण्यात आला सदर कार्यक्रमाच्या वेळी सभापती समीर ठाकूर, प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे ,आरोग्य निरीक्षक जितू मडवी व सर्व कर्मचारी उपस्थित होते. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कामोठे प्रभाग समिती 'क' अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या वेळी माननीय सभापती हेमलता म्हात्रे, नगरसेवक डॉ.अरुणकुमार भगत, गोपीनाथ भगत , नगरसेविका हेमलता गोवारी, संतोषी तुपे तसेच सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे प्रभाग अधिकारी अरविंद पाटील, आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, अतुल वासकर व सर्व कर्मचारी उपस्थित होते तसेच कामोठे शहरातील नागरिक उपस्थित होते.

## सिडको महामंडळातर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त खारघर व्हॅली गोल्फ कोर्स येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळातर्फे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ५ जून २०२१ रोजी खारघर व्हॅली गोल्फ कोर्स येथे, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबईच्या भौतिक विकासाकरिता कटिबद्ध असणाऱ्या सिडकोकडून शहरातील पर्यावरणाचे संवर्धन करून, हवामान बदल, तापमान वाढ यांसारख्या दुष्परिणामांना रोखण्यासाठी वृक्षारोपणासारखे पर्यावरणपूरक उपक्रमही नियमितपणे राबविण्यात येतात.

या प्रसंगी सिडकोतील कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक नाडगौडा, अतिरिक्त मुख्य अभियंता श्रीमती प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी आशुतोष उईके, अतिरिक्त मुख्य नियोजनकार दीपक हरताळकर, अधीक्षक अभियंता डी. आर. पाटील, महाव्यवस्थापक, पर्यावरण आणि ज्ञानेश्वर सोनवणे, वनक्षेत्रपाल, पनवेल उपस्थित होते. वर्तमानात वृक्षारोपणासारखे उपक्रम राबविले तर भविष्यात त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील, या दृष्टीकोनातून सिडकोतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी गोल्फ कोर्स मैदाभोवतीच्या वनक्षेत्रात कडूलिंब, जांभूळ, पिंपळ, वड, गुलमोहर, अशोक, मोह ही रोपे लावण्यात आली. खारघर व्हॅली गोल्फ कोर्स येथे लावण्यात आलेल्या या रोपांमुळे या परिसरातील मुळच्या निसर्गसौंदर्यात भरच पडणार आहे. यापूर्वी देखील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमनातळाच्या विकासपूर्व कामांतर्गत गाढी नदीच्या वळवलेल्या प्रवाहाच्या किनाऱ्यालगत व खारघर येथील प्रस्तावित मेट्रो मार्गालगत वृक्षारोपण करण्यात आले आहे. भविष्यात देखील निसर्गाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने सिडकोतर्फे अशाच प्रकारचे वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

